किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान/भरडधान्य खरेदीसाठी शेतकऱ्यांची नि:शुल्क नोंदणी करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२३२६/प्र.क्र.३०७ /ना.पु.-२९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०५ नोव्हेंबर, २०२६.

वाचा -

१. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र: खरेदी-११२५/प्र.क्र.२४०/ना.पु.२९ दिनांक २४ जुलै, २०२६.

२. मा. मंत्री (अनापु व ग्रासंवि) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त, क्र.खरेदी: २०२६/प्र.क्र.२८५/ ना.पु.२९ दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२६.

३. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र: खरेदी-११२६/प्र.क्र.२८७/ना.पु.२९ , दिनांक १५ ऑक्टोबर, २०२६.

प्रस्तावना:-

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार अंमलबजावणी केली जाते. सदर प्रक्रिया केंद्र शासनाने व राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे अनूपालन करुन अभिकर्ता संस्थांमार्फत केली जाते. या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना योजनेच्या हंगामाच्या सुरवातीला ऑनलाईन प्रक्रियेव्दारे नोंदणी करावी लागते. सदर नोंदणी करताना शेतकऱ्यांकडून विविध दस्ताऐवजाची मागणी केली जाते. याव्दारे प्रामुख्याने ७/१२, ८-अ, आधार कार्ड, बँक खाते इ. माहीती जतन केली जाते. ही नोंदणी अभिकर्ता संस्थामार्फत केली जाते. प्रत्यक्षात ही नोंदणी अभिकर्ता संस्थांमार्फत नेमण्यात आलेल्या उपअभिकर्ता संस्थांमार्फत केली जाते. शेतकऱ्यांनी आवश्यक नोंदणी केल्यानंतर शेतकऱ्यांकडून वेळापत्रकानुसार त्यांच्या धान्याची हमीभावानुसार खरेदी करण्यात येते.

२. किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाच्या महत्वाच्या योजनांपैकी आहे. या योजनेंर्तगत शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात लाभ पुरविण्यात येत आहे. सदर योजनेच्या लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी नोंदणी प्रक्रिया ही पुर्णपणे मोफत असून याबाबत कोणतीही फी आकारली जात नाही तसेच आकारण्याची तरतूद नाही. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शेतकरी नोंदणी करतेवेळी रक्कम आकारली जात असल्याबाबतच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या होत्या. याकरीता संबधितांना वेळोवेळी सूचनादेखिल देण्यात आल्या आहेत.

३. व्यापक शेतकरी हितासाठी सदर प्रकरणी शासन स्तरावरुन स्पष्ट निर्देश देण्याची व आवश्यकतेनुसार संबधितांवर कारवाई करण्यासाठी तरतूद करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांना स्पष्ट सूचना देण्याबाबत परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन परिपत्रक:-

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार अंमलबजावणी केली जाते. सदर प्रक्रिया केंद्र शासनाने व राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे अनूपालन करुन अभिकर्ता संस्थांमार्फत केली जाते. या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी योजनेच्या हंगामाच्या सुरवातीला ऑनलाईन प्रक्रियेव्दारे नोंदणी करावी लागते. प्रत्यक्षात ही नोंदणी अभिकर्ता संस्थांमार्फत नेमण्यात आलेल्या उपअभिकर्ता संस्थांमार्फत केली जाते. शेतकऱ्यांची सदर योजनेंतर्गत नोंदणी करण्यासाठी शासन पुढील प्रमाणे सूचना देत आहे:-

१. किमान आधाभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शेतकरी नोंदणी पूर्णपणे मोफत असून योजनेंतर्गत खरेदी केंद्रांवर नोंदणी करताना शेतकऱ्यांकडून कोणत्याही स्वरुपात शुल्क, कमिशन अथवा अतिरिक्त रक्कमेची मागणी करता येणार नाही.

२. खरेदी केंद्रांनी योजनेंतर्गत शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी शासनामार्फत दिनांक २४ जुलै, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या स्थायी आदेशांचे तसेच प्रसंगी केंद्र व राज्य शासनाव्दारे देण्यात येणाऱ्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन शेतकऱ्यांची विनामूल्य नोंदणी प्रक्रिया पार पाडावी.

३. शेतकऱ्यांची नोंदणी करण्याची प्रक्रिया ही पूर्णपणे नि:शुल्क असून याबाबत कोणत्याही खरेदी केंद्रावर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारणी करण्यात येवू नये. अशा बाबी निदर्शनास आल्यास शेतकरी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष धान भरडाई समन्वय समिती यांच्याकडे तक्रार करु शकतील.

४. नोंदणी नाकारण्याची अन्य काही वैध कारणे असल्यास त्याबाबत शेतकऱ्यांना संस्थेकडून लेखी स्वरुपात कळविणे आवश्यक राहील.

५. नोंदणी शुल्क मागणे, नोंदणी शुल्क न दिल्याने नोंदणी न करणे आदी बाबी निदर्शनास आल्यास जिल्हाधिकारी अशा संस्थांवर प्रकरण परत्वे काळया यादीत/ कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकण्याची कर्यवाही करु शकतील.

६. नोंदणी प्रक्रियेत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारे आर्थिक, तांत्रिक, अथवा प्रशासकीय अडचण निर्माण होणार नाही, याची सर्व संबधितांनी दक्षता घ्यावी. नोंदणी प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता राखून शेतकऱ्यांना विहीत कालमर्यादेत सेवा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी खरेदी केंद्रे व अभिकर्ता संस्था यांची राहील.

३. उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६११०५१९१३३२७०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C521002555E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.11.05 19:14:42 +05'30'

(प्रमोद पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा.मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव.
४. मा.मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
५. मा.मंत्री, पणन यांचे खाजगी सचिव.
६. मा.मंत्री, आदिवासी विकास, यांचे खाजगी सचिव.
७. मा.विरोधी पक्ष नेते (विधानसभा, विधानपरिषद)
८. मा.सर्व मंत्री, यांचे खाजगी सचिव.
९. सर्व विधानपरिषद सदस्य व विधानसभा सदस्य.
१०.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
११.अपर मुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१२.अपर मुख्य सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.अपर मुख्य सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
१६.सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
१७.सर्व विभागीय आयुक्त.
१८. सर्व जिल्हाधिकारी.
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि., मुंबई.
२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक.
२१. नियंत्रक (शिधावाटप) व संचालक नागरी पुरवठा(गो/वा),मुंबई.
२२. सर्व उप आयुक्त (पुरवठा).
२३. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
२४.सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.
२५. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
२६. उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई.
२७. सर्व सहसचिव/उप सचिव/अवर सचिव/सर्व अधिकारी, अनापु व ग्रासंवि, मंत्रालय, मुंबई.

२८. सरव्यवस्थापक, भारतीय अन्न महामंडळ, बोरीवली, मुंबई.
२९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती).
३०. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय ६ वा मजला, विधान भवन, मुंबई. (१०प्रती)
३१. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये, (प्रत्येकी ५ प्रती)
३२. निवड नस्ती (नापु-२९).